❍ दि. ३० जानेवारी २०२६
❍ शुक्रवार
❍ वर्ष ४ थे
❍ अंक ८९
❍ किंमत २ रूपये
❍ पृष्ठे ४
❍ लातूर
❍RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक
# अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे    ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

### आजचे पंचाग

❍दिनांक : ३० जानेवारी २०२६
❍वार : शुक्रवार
❍माह (अमावस्यांत) : माघ
❍माह (पूर्णिमांत) : माघ
❍ऋतु : शिशिर
❍आयन : उत्तरायण
❍पक्ष : शुक्ल पक्ष
❍तिथी : द्वादशी तिथी (सकाळी ११:०९ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी
❍नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (३१ जानेवारी पहाटे ०३:०७ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र
❍योग : वैधृति योग (संध्याकाळी ०४:५८ पर्यंत) त्यानंतर विष्कुम्भ य ोग
❍करण : बलवा करण (सकाळी ११:०९ पर्यंत) त्यानंतर कौलव करण
❍चंद्र राशी : मिथुन राशी
❍सूर्य राशी : मकर राशी
❍अशुभ मुहूर्त:
❍राहु काळ : सकाळी ११:२८ ते दुपारी १२:५२ पर्यंत
❍शुभ मुहूर्त:
❍अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१४
❍सूर्योदय : सकाळी ०७:१५
❍सूर्यास्त : सायंकाळी ०६:२९
❍संवत्सर : विश्वावसु
❍संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
❍विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
❍शक संवत: १९४७ शक संवत

# शासकीय इतमामात अजित दादा अनंतात विलीन

## पार्थ आणि जय पवारांनी दिली मुखाग्नी





बारामती : महाराष्ट्राच्या राजकारणातील एका धडाडीच्या आणि शिस्तप्रिय पर्वाचा आज बारामतीच्या मातीत शेवट झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी जड अंतःकरणाने आपल्या वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थितांचा काळजाचा ठोका चुकला आणि संपूर्ण विद्या प्रतिष्ठान परिसर शोकसागरात बुडाला.

पोलिसांची मानवंदना आणि 'अमर रहे'चा जयघोष

अंत्यसंस्कारापूर्वी महाराष्ट्र पोलिसांच्या पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून अजित पवार यांना मानवंदना दिली. बिगुलच्या करुण सुरांनी हवेत एक वेगळीच शांतता पसरली होती. जसा पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला, तसा लाखो कार्यकर्त्यांनी 'अजित दादा अमर रहे' आणि 'एकच वादा, अजित दादा' अशा घोषणा देत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

मुलांचा शोक आणि जनसागराची गर्दी

पार्थ आणि जय पवार आपल्या पित्याला निरोप देताना अत्यंत भावूक झाले होते. वडिलांचा वारसा आणि त्यांची शिस्त सोबत घेऊन चालणाऱ्या या दोन्ही पुत्रांना सावरताना जवळच्या नातेवाईकांनाही कठीण जात होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. बारामतीकरांनी आपल्या या 'लोकनेत्या'ला निरोप देण्यासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती, ज्याचे रूपांतर दुपारी एका अलोट जनसागरात झाले.

## गृहमंत्री अमित शहा, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून दादांना अखेरचा निरोप



बारामती : गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांना अखेरचा निरोप दिला आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बारामतीत अजित पवारांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करत अंतिम दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही उपस्थिती होती. तिघांनीही एकत्र येत अजित पवारांच्या पार्थिवास अभिवादन केले.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एका धडाडीच्या आणि शिस्तप्रिय पर्वाचा आज बारामतीच्या मातीत शेवट झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी जड अंतःकरणाने आपल्या वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थितांचा काळजाचा ठोका चुकला आणि संपूर्ण विद्या प्रतिष्ठान परिसर शोकसागरात बुडाला.

**मुलांचा शोक आणि जनसागराची गर्दी :**

पार्थ आणि जय पवार आपल्या पित्याला निरोप देताना अत्यंत भावूक झाले होते. वडिलांचा वारसा आणि त्यांची शिस्त सोबत घेऊन चालणाऱ्या या दोन्ही पुत्रांना सावरताना जवळच्या नातेवाईकांनाही कठीण जात होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. बारामतीकरांनी आपल्या या 'लोकनेत्या'ला निरोप देण्यासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती, ज्याचे रूपांतर दुपारी एका अलोट जनसागरात झाले.

**परत या, परत या …**

**अजितदादा परत या :**

अजित पवार यांच्या पार्थिवावर आज म्हणजेच गुरुवारी (दि. २९ जानेवारी) त्यांच्या कर्मभूमीत अर्थात बारामती येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आपल्या लाडक्या दादांना निरोप देण्यासाठी बारामतीत जनसागर लोटला. यावेळी कार्यकर्त्यांकडून परत या, परत या … अजितदादा परत या, थांबा! आमच्या दादांना नेऊ नका, आम्ही पाया पडतो अशा शब्दांमध्ये आक्रोश सुरू आहे. संपूर्ण वातावरणात शोककळा पसरली आहे. सर्वांना आपले अश्रू थांबवून ठेवणं कठीण झालं आहे.

## वरळी कोस्टल रोडवर उभारणार मुंबईतील तिसरा हेलिपॅड

मुंबई : वरळीत मुंबईच्या कोस्टल रोडवर लवकरच हेलिपॅडची सुविधा उभारण्यात येणार आहे. हेलिकॉप्टर लँडिंगसाठी राजभवन, महालक्ष्मी रेसकोर्स आणि आता कोस्टल रोड हा एक नवीन पर्याय उपलब्ध होणार आहे.



वरळी येथे उभारण्यात आलेल्या मुंबईतील पहिल्या सार्वजनिक हेलिपॅडचे संचालन आणि देखभालसाठी महापालिकेने कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यासाठी २ फेब्रुवारीपर्यंत निविदा सादर केली जाणार आहे.

वरळीमध्ये समुद्रात १०० मीटर अंतरावर असलेल्या जेट्टीवर हे **(पान २ वर)**

## प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट

नवी दिल्ली, २९ : देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता.




या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे.

केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून 'भारतीय नौदल' तर निमलष्करी दलातून 'दिल्ली पोलीस' यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम्' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## अजित पवारांच्या पश्चात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या कोणाकडे? राजकीय वर्तुळाच्या नजरा मुख्यमंत्र्यांकडे

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे राज्याच्या प्रशासनात आणि राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. 'शब्दाचा पक्का' आणि 'हिशोबाचा पक्का' अशी ओळख असलेल्या पवारांच्या जाण्याने राज्याचा अर्थकारभार कोण सांभाळणार, असा पेच ऐन अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर निर्माण झाला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अर्थमंत्रिपदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःकडे घेण्याची दाट शक्यता आहे. यापूर्वीही फडणवीस यांनी अर्थमंत्री म्हणून राज्याचा अर्थसंकल्प सादर केला असून, त्यांचा प्रशासकीय अनुभव लक्षात घेता सध्याच्या तातडीच्या परिस्थितीत



राज्याची तिजोरी मुख्यमंत्र्यांकडेच राहण्याचे संकेत मिळत आहेत. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत असून, अधिवेशनाच्या सुरुवातीलाच राज्याचा वार्षिक अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अजित पवार यांनी अर्थखात्यावर मजबूत पकड निर्माण केली होती. त्यांच्या अनुपस्थितीत नव्या अर्थमंत्र्यांना अत्यंत कमी कालावधीत अर्थसंकल्पाची तांत्रिक आणि प्रशासकीय तयारी पूर्ण करण्याचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे.

अजित पवारांच्या नावे विक्रम

अजित पवार यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत आतापर्यंत दहा वेळा राज्याचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला असून, सर्वाधिक वेळा बजेट मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाची शैली, शेरोशायरी आणि ठळक घोषणा यांची नेहमीच चर्चा होत असे. **(पान २ वर)**

## एसटी चालकांच्या मद्यपानाविरुद्ध कडक पावले; मुख्यालयाकडून कठोर निर्देश

मुंबई : २५ जानेवारी रोजी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी अचानकपणे परळ बसस्थानकाला भेट दिली. त्यावेळी चालक -वाहक विश्रांतीगृहांमध्ये अनेक ठिकाणी मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळल्या . तसेच काही कर्मचारी मद्यपान केल्याचे देखील आढळून आले. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व आगारात कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकांची ब्रेथ आणलायझर चाचणी अनिवार्य करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले. त्यानुसार कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या एसटी चालकांविरुद्ध कठोर आणि तातडीची कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाकडून देण्यात आले आहेत.

प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही मोहीम अधिक काटेकोरपणे राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या यंत्र अभियंता (चालन) विभागामार्फत सर्व विभाग नियंत्रक, विभागीय कार्यशाळा तसेच संबंधित अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांनुसार, कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकाने मद्यपान केले नसल्याची खात्री



करणे आता अधिक सक्तीचे करण्यात आले आहे.

तपासणी अधिक कडक

१)कर्तव्यावर जाणाऱ्या चालकांनी मद्यपान केले नसल्याची खात्री करूनच त्यांना ड्युटीवर पाठविण्यात यावे. २)ज्या चालकाला विशिष्ट वाहनावर कर्तव्य देण्यात येणार आहे, त्या वाहनासोबतच त्याची अल्कोहोल तपासणी (ब्रिथ ॲनालायझर चाचणी) करण्यात यावी. ३)वाहन परीक्षकांनी चालकाची तपासणी न करता वाहन बाहेर जाऊ देऊ नये. ४)मद्यपान केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित चालकाला तत्काळ कर्तव्यातून दूर ठेवून त्याची माहिती आगार व्यवस्थापकांना द्यावी.

**(पान २ वर)**

## एकूर्गा जिल्हा परिषद गटात वारं फिरलं : भाजपा पक्षातील असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

### एकूर्गा ग्रामपंचायचे सदस्य बालाजी व्यंकट चव्हाण यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी कॉंग्रेसचा झेंडा घेतला हाती

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर / प्रतिनिधी : मिनी मंत्रालय म्हणुन ओळख असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची धामधुम जिल्हयात सुरु आहे. कॉंग्रेस पक्षाने लातूर महानगर पालिका निवडणुकीत एक हाती सत्ता मिळवल्या नंतर कॉंग्रेसचा गढ असलेल्या मांजरा पट्टयात काळाची पावले ओळखत भाजपातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा ओढा कॉंग्रेस पक्षाकडे वाढला आहे. एकूर्गा जिल्हा परिषद गटातील कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार दत्तात्रय काकासाहेब टेकाळे यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत एकुर्गा



गटातील भाजपातील असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बाभळगाव येथे कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यांनी घेतला कॉंग्रेस पक्षात प्रवेश कॉंग्रेसच्या धोरणावर व लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत एकूर्गा ग्रामपंचायतचे सदस्य व्यंकट चव्हाण, बापू इंगळे, रंजीत अडसूळ, गोविंद रोडके, अमर खेडकर, विष्णु इंगळे, संदिप घुटे, अनिल इंगळे, राम घुटे, काका भालेकर, अजय गंगणे, दादा घुटे, अविष्कार घुटे, रवि घुटे, महेश सोमवंशी, सुमित घुटे, विष्णु घुटे, समाधान गायकवाड, सचिन ढवारे, अजय सुरवसे यांच्यासह भाजपाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कॉंग्रेसचा झेडा हाती घेत कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला.

छावा संघटनेच्या पदाधिकारी यांनी दिला एकुर्गा गटातील कॉंग्रेस उमेदवारांना पाठींबा जिल्हा परिषद व पंचायत समिती **(पान २ वर)**

## भाजपला मत म्हणजे विकासाला मत औसा तालुक्याच्या विकासाला आणखी गती देण्याचे आ. अभिमन्यू पवारांचे आवाहन

**दै. अदिती एक्सप्रेस**

औसा : सरपंचपदाच्या काळापासून ते आमदारकीपर्यंत औसा तालुक्याचा सर्वांगीण विकास हाच ध्यास ठेवून सातत्याने काम केले असल्याचे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. हा मतदारसंघ नसून माझा परिवार आहे, असे भावनिक उद्गार काढत त्यांनी आलमला गावासाठी सुमारे ८० लाख रुपयांचा विकासनिधी उपलब्ध करून दिल्याचे स्पष्ट केले. मागील ५० वर्षांत जेवढा निधी मिळाला नाही, त्यापेक्षा अधिक निधी माझ्या आमदारकीच्या काळात या गावाला मिळाला असून पुढेही निधी कमी पडू देणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी आलमला येथे झालेल्या जाहीर सभेत दिली.

यावेळी मंचावर शितल रविकुमार चिलमे, गंगाबाई माणिकराव कोळेकर (थोरात), बाळिका सदाशीव स्वामी, बसवराज धाराशीवे, किरण उटगे, सूर्यकांतजी शिंदे, कैलास निलंगेकर, रवि चिलमे, दौलत




वाघमारे, प्रभाकर कापसे, वीरनाथ लोणारे, शशीकांत पथिल आणि दिपक थोरात आदी उपस्थित होते. आमदार पवार पुढे बोलत होते की ही निवडणूक खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाची असल्याचे सांगत आमदार पवार म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनात्मक व्यवस्थेमुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा अशा सर्व स्तरांवर लोकशाही बळकट झाली आहे. याच निवडणुकांमधून कार्यकर्ते घडतात आणि नेते तयार होतात, हा आमचा इतिहास आहे, असेही त्यांनी नमूद केले.पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून गावपातळीवर मायक्रो प्लॅनिंग, तळागाळातील प्रश्न, घरकुल, शौचालय, पाणीपुरवठा, वीज, शेतीरस्ते यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता येते. त्यामुळे या निवडणुकीत विकासावरच बोला, कारण ही निवडणूक विकासाची आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन ओलीताखाली आली असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा झाला आहे. औसा येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना **(पान २ वर)**

# शब्दाला जागणारा नेता

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजितदादांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते.

शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभे राहिले नाहीत, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी ‘कामाचा नेता’ होते. अजित पवार म्हणजे एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी त्यांची ओळख. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प हाताळला. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. ‘सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही’ हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले.

अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणांपेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड ठेवणे, निर्णयांची अंमलबजावणी करून घेणे आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अर्थसंकल्पीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकाऱ्यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली. अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले. लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधीकधी बोचऱ्या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख. ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली.

सत्तेत असो वा विरोधात; अजितदादांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली. अजित पवार हे कार्यक्षम, परंपरागत राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारणारे नेते होते. स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, कठोर प्रशासकीय भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे अजित पवार यांची ओळख एक कठोर प्रशासक नेता अशी निर्माण झाली. ते केवळ राजकारणी नसून एक कार्यक्षम प्रशासक म्हणूनही ओळखले गेले. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे पुतणे होते; मात्र त्यांनी केवळ घराणेशाहीच्या जोरावर राजकारणात स्थान मिळवले, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी अनेक वेळा समर्थपणे सांभाळल्या. अधिकारी वर्गाला थेट प्रश्न विचारणे, वेळेची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि निकालाभिमुख प्रशासन यावर त्यांचा भर असायचा. अनेक वेळा त्यांच्या भाषेतील रोखठोकपणा चर्चेचा विषय ठरायचा; मात्र काम लवकर आणि प्रभावीपणे पूर्ण व्हावे, हाच त्यामागील उद्देश असायचा. जलसंपदा मंत्री असताना त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली. अवघड परिस्थितीतही निर्णय घेण्याची त्यांची तयारी असायची. राजकीय धाडस, सत्ता संतुलनाचे भान आणि प्रसंगी आक्रमक भूमिका घेण्याची क्षमता यामुळे ते वेगळे ठरले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांनी राज्याच्या आर्थिक नियोजनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प मांडताना वास्तववादी आकडे, विकासावर भर आणि वित्तीय शिस्त यांचा समतोल साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून आला.

कठोर प्रशासक असूनही अजितदादांनी जनतेशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. दौरे, आढावा बैठक, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी यामुळे ते जमिनीवरील वास्तव जाणून घेत. बारामती मतदारसंघातील विकासकामे हे दादांच्या कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण मानले गेले. ते लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देत. त्यांच्या मते, प्रशासन हे शिस्त, वेग आणि निर्णयांवर चालते. त्यामुळेच त्यांना ‘कठोर पण कार्यक्षम प्रशासक’ अशी ओळख मिळाली. त्यांच्या कार्यशैलीवर टीका होत असली, तरी राज्याच्या प्रशासनात गती, शिस्त आणि विकासाचा दृष्टिकोन रुजवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता मात्र ही सर्व चर्चा थांबणार आहे. राज्यातील जनता नेहमीच त्यांना आठवणींमध्ये जपणार आहे.

# रब्बी हंगामासाठी सिंचन प्रकल्पातील पाणी मागणीसाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

## घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्पाचा समावेश

लातूर, दि. २९ : लातूर पाटबंधारे विभाग क्रं. २ विभाग अंतर्गत घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्प, तसेच ९८ लघु प्रकल्प, साठवण तलाव व बॅरेजस आदी प्रकल्पातील पिण्यासाठी आवश्यक आरक्षित पाणीसाठा वगळता उर्वरित पाणी रब्बी हंगामात सिंचनासाठी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित पाटबंधारे विभागाच्या शाखा अधिकारी कार्यालयात पाणी मागणी अर्ज सादर करावेत, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता सर्व सिंचन लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ व ७ अ शासनाने सुधारित केलेल्या नमुन्यात संबंधित शाखा अधिकारी यांचे कार्यालयात पाणी अर्ज भरून शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत. तसेच कमी पाण्यात येणारी रब्बी हंगामी पिके प्राधान्याने घ्यावीत. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा विचार करता, प्रवाही सिंचनावरील ऊस आदी बारमाही पिकांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहील, याची शाश्वती देता येणार नाही. त्यामुळे बारमाही पिकांची लागवड करताना याबाबीचा विचार करावा आणि काटकसरीने पाणी वापरावे.

अर्जदार हा संबंधित जमिनीचा मालक असणे आवश्यक आहे. पाणी अर्जासोबत सातबारा उतारा सादर करावा. मागील थकबाकी पूर्ण भरावी व रितसर पावती घ्यावी. पाणी मागणी क्षेत्र ०.२० आरच्या पटीत (कमीत कमी ०.२० आर क्षेत्र) असावे. तसेच अर्जासोबत थकीत पाणीपट्टी भरल्यानंतर पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल. पाणी अर्ज मंजूर झाल्यानंतर पिकास पाणी घ्यावे. आपआपल्या हद्दीतिल शेतचाऱ्या दुरुस्तीची जबाबदारी संबंधित बागायतदाराची राहील. शेतचारी नादुरुस्त असल्यास मंजुरी दिली जाणार नाही व पाणी दिले जाणार नाही. मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्र सिंचीत केल्यास हंगामी दराच्या दीडपट दराने आकारणी केली जाईल. पाणी अर्ज न देता पाणी घेतल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा सिंचन परवानाधारकाने त्यांचे मंजूर क्षेत्रास ठरवून दिलेल्या तारखेस पाणी कालव्याच्या शेवटपासून ते सुरवात याप्रमाणे घ्यावे. सिंचन नियोजन असल्यास मंजूर कालावधी सोडून कृषीपंप चालू ठेवल्यास सिंचन अधिनियम १९७६ चे कलम ९७ नुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे, विद्युत मोटारी जप्त करणे, पाणीपरवाना रद्द करणे, व बिगर पाळी पंचनामा करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रचलीत पाणीपट्टीच्या दराने आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानीक कर आकारला जाईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी पाटबंधारे विभागावर राहणार नाही.

प्रसिद्ध केलेल्या पाणी पालीच्या नियोजनाच्या कालावधीत काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणी उदभवल्यास या जाहीर निवेदनाद्वारे देण्यात आलेल्या पाणी पाळीच्या नियोजनामध्ये बदल करण्याचे हक्क लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवले आहेत. उपसा सिंचन परवानाधारकांनी इतरांना पाणी दिल्यास किंवा मंजूर सिंचन परवान्यातील ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेची विद्युत मोटार आढळल्यास सिंचन परवाना रद्द करण्यात येईल. जबरदस्तीने अथवा विनापरवानगी गेट उघडल्यास, कालवा फोडून पाणी घेतल्यास पाटबंधारे अधिनियम १९७६ चे खंड क पोटकलम क व ख अन्वये दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा व ठिबक सिंचन पाणी परवानाधारकांचे पाणी अर्ज प्रथम प्राधान्याने मंजूर करून एकपट दरानेच अकारणी करण्यात येईल. तसेच ज्या लाभधारकांचे पाणी परवाने उपलब्ध नाहीत, त्या लाभधारकांस विनापरवाना व अनाधिकृत पाणी उपसा समजून संबधितास दिडपट दराने अकारणी करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त लाभधारकांनी पाणी परवाने घेवूनच सिंचनासाठी पाणी घ्यावे व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात १७ कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

लातूर, दि. २९ : रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खत आणि कीटकनाशकांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. पुणे येथील संचालक (नियंत्रण व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालयाच्या सूचनेनुसार लातूर जिल्ह्यात भरारी पथक आणि कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांनी कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली होती. तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एकूण १७ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले.

या मध्ये बियाणे विक्रीचे १३, खत विक्रीचे २ आणि कीटकनाशक विक्रीचे २ परवाने रद्द झाले आहेत.तसेच ८ कृषी निविष्ठा केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही/अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्त्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवल्यास बियाणे अधिनियम १९६६, नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, कीटकनाशक कायदा १९६८ आणि कीटकनाशक नियम १९७१ नुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी स्पष्ट केले.

# लग्नानंतर विभक्त राहल्यास विवाह नोंदणी औपचारिक

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले की, लग्नानंतर जर पती-पत्नी एकत्र राहत नसतील तर लग्नाची नोंदणी ही केवळ एक औपचारिकता आहे, त्याहून अधिक काही नाही. न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती रेणू भटनागर यांच्या खंडपीठाने म्हटले की, याचा वापर एका वर्षात घटस्फोट घेण्यास नकार देण्यासाठी केला जाऊ शकत नाही. उच्च न्यायालय नुकतेच एका महिलेच्या याचिकेवर सुनावणी करत होते. महिलेने कुटुंब न्यायालयाच्या त्या आदेशाला आव्हान दिले होते, ज्यात लग्नाच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी संयुक्त याचिका सादर करण्याची परवानगी नाकारण्यात आली होती.




याचिकेत म्हटले होते की, दोन्ही पक्ष कधीही एक दिवसही एकत्र राहिले नाहीत, लग्न कधीही पूर्ण झाले नाही, आणि दोघेही लग्नानंतर लगेचच आपापल्या आई-वडिलांच्या घरी वेगळे राहू लागले. न्यायालयाने म्हटले की, हे प्रकरण एचएमएच्या कलम १४ अंतर्गत तयार केलेल्या अपवादाच्या कक्षेत येते. म्हणून न्यायालयाने दाम्पत्याचा अर्ज मंजूर केला आणि त्यांना परस्पर संमतीने घटस्फोटासाठी त्यांची संयुक्त याचिका सादर करण्याची परवानगी दिली.

लग्न वाचवण्याचे प्रयत्न केले नाहीत

फॅमिली कोर्टने एचएमएच्या कलम १४ अंतर्गत घटस्फोटाला परवानगी देण्यास नकार दिला होता. कोर्टाने म्हटले होते की पक्षकार असाधारण अडचणीचे प्रकरण सिद्ध करण्यात अयशस्वी ठरले आहेत. कोर्टानुसार, लग्न वाचवण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले गेले नाहीत. कोर्टाने असेही म्हटले की, लग्नानंतर लगेच नोंदणी करणे त्यांच्या असाधारण अडचणीच्या दाव्याच्या विरोधात आहे.

लग्न कधीच पूर्ण झाले नाही

महिलांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने मानले की, दोन्ही पक्ष कधीच एकत्र राहिले नाहीत आणि लग्न कधीच पूर्ण झाले नाही, हे तथ्य सध्याच्या वैवाहिक संबंधाच्या पायावरच प्रश्नचिन्ह निर्माण करते. न्यायालयाने म्हटले की, केवळ कागदोपत्री असलेल्या अशा विवाहाला सुरू ठेवण्याचा आग्रह धरणे योग्य नाही. उच्च न्यायालयाने म्हटले की, कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय पक्षांना अनावश्यक अडचणी सहन करण्यास भाग पाडेल.

# अजितदादांचे पीएसओ विदीप जाधवांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार



सातारा : बारामती येथील भीषण विमान अपघातात केवळ महाराष्ट्राने एक खंबीर नेतृत्वच गमावले नाही, तर अजित पवार यांच्यासोबत सावलीप्रमाणे असणा-या सुरक्षा रक्षकाची कायमची साथ सुटली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वैयक्तिक सुरक्षा अधिकारी विदीप जाधव यांच्यावर काल रात्री उशिरा सातारा जिल्ह्यातील तरडगाव येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले. विदीप जाधव अनंतात विलीन झाले, तेव्हा उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

विदीप जाधव यांचे पार्थिव गुरुवारी रात्री उशिरा त्यांच्या मूळ गावी तरडगाव येथे पोहोचले. पालखी तळावर त्यांच्या अन्त्ययात्रेसाठी संपूर्ण गाव लोटले होते. ‘विदीप जाधव अमर रहे’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. पोलिस दलाच्या वतीने त्यांना हवेत फैरी झाडून मानवंदना देण्यात आली आणि शासकीय इतमामात त्यांच्यावर अन्त्यसंस्कार पार पडले.

जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून ठाण्यातील कळवा-विटावा परिसरातील कृष्णा विहार गल्लीत वास्तव्यास होते. त्यांच्या निधनाची बातमी वा-यासारखी पसरली आणि संपूर्ण वसाहत सुन्न झाली. शेजारी राहणा-यांनी जड अंत:करणाने सांगितले की, ‘सकाळी साडेसहा वाजता त्यांना कामावर जाताना पाहिले होते. नेहमीप्रमाणे त्यांनी हात उंचावून हसत निरोप दिला. मात्र, अवघ्या दोन तासांत ही काळीज चिरणारी बातमी येईल, असे कधीच वाटले नव्हते.

२७ वर्षांपासूनचे त्यांचे एक मित्रही भावूक झाले होते. त्यांच्या मते, विदीप जाधव हे केवळ एक पोलिस अधिकारी नव्हते, तर ते एक सुसंस्कृत आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाणारे व्यक्तिमत्त्व होते. बुधवारी सकाळी त्यांनी नेहमीच्या सवयीप्रमाणे बाय करण्यासाठी हात हलवला, तीच त्यांची शेवटची भेट ठरली.

चिमुकल्यांच्या डोक्यावरून हरपले पितृछत्र

विदीप जाधव यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, १४ वर्षांची मुलगी आणि ९ वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. अपघाताच्या वेळी त्यांचे आई-वडील मूळ गावी होते. या चिमुकल्यांना आपल्या वडिलांचे छत्र हरपल्याची कल्पना देणेही कठीण झाले आहे. गेल्या २२ वर्षांपासून मुंबई पोलिस दलात असणा-या जाधव यांनी शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या कर्तव्याचे पालन केले

पान १ वरून

## वरळी कोस्टल...

अत्याधुनिक हेलिपॅड उभारण्यात येणार आहे. हे हेलिपॅड दक्षिण मुंबईतील पहिलेच सरकारी मालकीचे सार्वजनिक हेलिपॅड असणार आहे.

हेलिपॅड चालवण्याचे कंत्राट सुरवातीला पाच वर्षांच्या कालावधीसाठी दिले जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कंत्राटदाराने पालिकेला ठराविक मासिक परवाना शुल्क आणि प्रत्येक लँडिंगमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा द्यावा लागेल, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

हेलिपॅडचे वैशिठ्ये

या हेलिपॅड चे वैशिष्ठ्ये म्हणजे, आपत्कालीन काळात रुग्णांना तातडीने रुग्णालयात नेण्यासाठी या हेलिपॅडचा वापर प्राधान्याने केला जाणार आहे. तसेच किनारपट्टीची सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनेसाठी कोस्टल पोलीस व सुरक्षा दलांना हे केंद्र फायदेशीर ठरणार आहे. सरकारी तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या प्रवासासाठी देखील याचा फायदा होणार आहे.

## अजित पवारांच्या...

यंदाही त्यांच्या बजेटकडून राज्याला मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र काळाने त्याआधीच त्यांच्यावर झडप घातली.

अर्थ खाते कोणाकडे?

दरम्यान, महायुती सरकारमध्ये अर्थखाते हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आले होते. त्यामुळे हे खाते पुन्हा त्याच गटातील एखाद्या ज्येष्ठ नेत्याकडे सोपवले जाणार की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःकडेच ठेवणार, यावर महायुतीच्या कोअर कमिटीत चर्चा होण्याची शक्यता आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीत राज्याचा आर्थिक डोलारा सावरण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री हे खाते स्वतःकडे ठेवतील, अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

## एसटी चालकांच्या...

आगार व्यवस्थापकांवर जबाबदारी

आगार व्यवस्थापकांनी अशा प्रकरणांची स्वतः खात्री करून संबंधित चालकांविरुद्ध नियमानुसार तातडीने शिस्तभंगाची कारवाई करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासोबतच, मुख्यालयाकडून अचानक तपासण्या (सरप्राइज चेक) घेण्यात येणार असल्याने सर्व आगारांनी या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

प्रवासी सुरक्षेला प्राधान्य

एसटी ही राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे चालकांची शारीरिक व मानसिक स्थिती उत्तम असणे अत्यावश्यक आहे. मद्यपान करून वाहन चालविणे ही गंभीर बाब मानून महामंडळाने शून्य सहनशीलता धोरण अवलंबले असल्याचे या परिपत्रकातून स्पष्ट झाले आहे.

या निर्णयामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत अधिक वाढ होणार असून एसटी सेवेत शिस्त आणि जबाबदारी अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली जात आहे.

## एकूर्गा जिल्हा...

निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे उमेदवार दत्तात्रय काकासाहेब टेकाळे यांच्यासह सर्व उमेदवारांना छावा संघटनेचे पदाधिकारी ड. व्यंकटेश नागटीळक, अरविंद गाडे यांनी पाठींबा दिला आहे. याबाबत लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची भेट घेऊन काँग्रेस पक्षाच्या एकुर्गा गटातील सर्व उमेदवारांना निवडून आणण्यासाठी कार्य करणार असल्याचा विश्वास दिला.

मांजरा पट्टायात सहकाराची चळवळ रुजली आहे. शेतकऱ्यांच्या हिताची जपवणुक करणारे नेतृत्व म्हणुन काँग्रेस नेत्यांकडे पाहिले जाते. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, माजी मंत्री, सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी दुरद्रष्टी दाखवत याभागाच्या सर्वांगीन विकासासाठी बॅरेज उभारुन शेतीच्या सिंचनासाठी पाण्याची सोय उपललब्ध करुन दिली. शेतकरी व सर्वसामान्या नागरिक आर्थिक सक्षम व्हावा यासाठी साखर कारखानदारी उभारली. हा विकासाचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख व जिल्हा बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धिरज देशमुख निष्ठेने करत आहेत. जुन्या जाणत्या लोकांना तर काँगेस पक्षावर विश्वास होताच आता युवा पिढीला देखील काँग्रेस पक्षाच्या धोरणावर व नेतृत्वावर विश्वास निर्माण झाला आहे. याचेच घोतक म्हणजे भाजपातील असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात झालेला जाहीर प्रवेश हे आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी दरम्यान भजपातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या काँग्रेस पक्षात झालेल्या प्रवेशामुळे एकुर्गा गटात काँग्रेसचे बळ वाढले आहे. सोबतच भाजपा कमजोर पडली असुन भाजपा नेत्यांचे मनोबल घटले आहे. निवडणुक प्रचाराच्या सुरुवातीलाच भाजपाला बसलेला या झटक्याने मांजरा पट्टयात भाजपा बॅक फुटवर गेल्याचे पहायला मिळत आहे.

यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते ओम घुटे, नारायण पाटील, पंकज पटाडे, राम कोरके, विष्णु पटाडे यांच्यासह एकुर्गा गावातील नागरिक यांची उपस्थिती होती.

## भाजपला मत...

होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पाच वर्षांत विकास केला नाही तर मत मागायला येणार नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगत जिल्हा परिषद व पंचायत समिती आमच्या ताब्यात देण्याचे आवाहन केले.

मांजरा नदीचे वाहून जाणारे पाणी अडवून तावरजा नदीद्वारे शेतीसाठी वापरण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. गोगलगाय व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सुमारे १०० कोटी रुपयांची मदत सरकारकडून मिळवून दिल्याचेही त्यांनी नमूद केले. भाजपला मत म्हणजे विकासाला मत, असे सांगत औसा तालुक्याचा झपाट्याने विकास करायचा असेल तर जिल्हा परिषद व पंचायत समिती आमच्या ताब्यात द्या, असे आवाहन करत त्यांनी सभेचा समारोप केला.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# कट मारल्याचा बहाणा करत लातुरात वाटमारी करणाऱ्या टोळीला पकडले

## पोलिसांची कारवाई : ४ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल जप्त



लातूर : दुचाकीला कट मारल्याचा बहाणा करत नागरिकांना लुटणाऱ्या एका सराईत टोळीला विवेकानंद चौक पोलिसांनी अटक केली. या कारवाईमध्ये पोलिसांनी ४ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.. लातुरात सक्रिय झालेल्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

पोलिसांनी सांगितले, शनिवार, २४ जानेवारी रोजी गरुड चौक परिसरात एका व्यक्तीला 'तुमच्यामुळे आमचा मोबाइल फुटला' असे म्हणत तिघांनी अडवले. त्यांना धमकावून सोन्याची अंगठी हिसकावत पळ काढला. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली. आरोपींच्या अटकेसाठी, शोधासाठी नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयास्पद, विना नंबरप्लेट दुचाकीसह वसीम रज्जाक शेख (वय. २६, रा. सिंदगाव) याच्यासह दोघा बालकांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता, त्यांनी विवेकानंद चौक, एमआयडीसी आणि शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीत असेच गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यांच्याकडून ३४ ग्रॅम सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा ४ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर डीवायएसपी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. संतोष पाटील, सपोनि. खोडेवाड, मुळे, पोउपनि. रेडेकर, सफौ. गुंडरे, अंमलदार खुर्रम काझी, रवींद्र गोंदकर, यशपाल कांबळे, गणेश यादव, रणवीर देशमुख, धैर्यशील मुळे, सचिन राठोड, प्रेमानंद कांबळे, खंडू कोळी यांनी केली.

# जनतेला समर्पित नेतृत्व गमावले : अजित पाटील कव्हेकर



लातूर ( प्रतिनधी ) :- मातीशी नाळ जोडलेला आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथील शहर जिल्हा भाजपाच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अजित कव्हेकर पाटील बोलत होते. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मंडल अध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सचिन सुरवसे, ॲड. प्रदिप मोरे आदींची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार हे लोकनेते असल्याचे सांगून त्यांचा तळागाळापर्यंत जनसंपर्क होता. असे अजित पाटील कव्हेकर म्हणाले. अजित दादा पवार यांचे अपघाती निधन सर्वांसाठी धक्कादायक व दुखदायक असून त्यांच्या जाण्याने राज्याची मोठी हानी झाली आहे. अहोरात्र जनतेसाठी झटणारे कर्तव्यदक्ष नेता म्हणून ओळख असणारे अजित पवार तितकेच स्पष्टवक्ते व परखड होते. रोखठोक भूमिका मांडताना त्यांनी संवेदनशीलपणा जपलेला होता. जनतेसह कार्यकर्त्यांशी थेट संपर्क असणारे दादा राज्याच्या विकासासाठी अग्रेसर राहिलेले होते. प्रशासनावरील पकड व अधिकारी वर्गात असणारा त्यांचा दरारा त्यांच्या कार्यकुशलतेचा सातत्याने साक्षी देणारा होता. राजकारणा पलीकडे जाऊन अनेकांशी त्यांनी आपले संबध जपलेले होते. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला अजित पवार आपल्या कुटुंबाचे भाग आहेत असेच वाटत होते. त्यांच्या अकाली निधनाने राज्याचीच नव्हे तर देशाची हानी झालेली असून हि पोकळी भरून निघणे अशक्य असल्याचे अजित पाटील कव्हेकर म्हणाले.

या श्रद्धांजलीस नगरसेवक विनय जाकते, ऋषिकेश राजे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका शितल मालू, शोभा पाटील, राजश्री धोत्रे, अविनाश कोळी, ज्योतिराम चिवडे, सतीश मिरचे, विजय अवचारे, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, धनंजय हाके, नितीन कोरे, संतोष पांचाळ, संतोष तिवारी, पवन आल्टे, नय्युम शेख, अक्षय स्वामी, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मद्यधुंध वाहनचालकाची धडक अन् ३० ते ४० विद्यार्थ्यांचे जीव टांगणीला

पुणे : हल्ली वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवल्यामुळे अनेक रस्ते अपघाताच्या घटना या घडत आहे. असाच एक धक्कादायक आणि निष्काळजीपणाचा कळस असलेला प्रकार पुण्यातून उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे चक्क ३० ते ४० विद्यार्थ्यांचे जीव हे टांगणीला लागले होते.

नेमकं घडलं काय?

सोमवारी दुपारी पावणे तीनच्या सुमारास वाघोली रोडवर ही घटना घडली. बायफ रोडवरील इंडो स्कॉट ग्लोबल शाळेच्या मद्यधुंद बस चालकाने चार दुचाकी आणि एका कार ला धडक जोरदार धडक दिली . बस चालकाने काही अंतरावर वाहन फरफटतही नेली.

मिळलेल्या माहितीनुसार बत्ता बसंत रसाळ (वय ५० ) असे अटक केलेल्या बस चालकाचे नाव आहे. या भयंकर अपघातानंतर नागरिकांनी शाळेच्या बसचा पाठलाग केला आणि बस थांबवली. या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी बस चालकाला बेदम चोप देत पोलिसांच्या हवाली केले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसून विद्यार्थ्यांचे जीव थोडक्यात बचावले.

# पवार कुटुंबियांचे माजी आ. धिरज देशमुख यांच्या कडून सांत्वन

लातूर :-- महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय नेते, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पार्थिवाचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी काटेवाडी येथील निवासस्थानी आणि बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर जाऊन अंत्यदर्शन घेतले. पवार कुटुंबीयांचे तसेच खासदार सुप्रियाताई सुळे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

महाराष्ट्राचे हित डोळ्यासमोर ठेवून कार्य करणारा एक मोठा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. अजितदादा हे महाराष्ट्राचे लाडके नेते होते. घराघरात पोचलेले दादा होते. लोकसेवेसाठी त्यांनी स्वतःचे आयुष्य वाहून घेतले होते. आम्हाला त्यांच्याकडून हा लोकसेवेचा संस्कार शिकता आला.

मी पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर विधिमंडळात आलो, त्यावेळी अजितदादांनी कायम मार्गदर्शन केले. आमदार म्हणून जबाबदारी काय असते, विधिमंडळात प्रश्न कसे मांडावेत अशा विविध विषयांवर नव्याने निवडून आलेल्या युवा आमदारांना ते सल्ला द्यायचे. अशावेळी 'समोरचा आमदार कोणत्या पक्षाचा आहे', हे ते पहायचे नाहीत. विविध पक्षातील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी त्यांचे मैत्रीचे, आपुलकीचे संबंध होते. त्यांचे कार्य, त्यांनी दिलेले योगदान कायम नवी दिशा देणारे आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेब, आदरणीय गोपीनाथ मुंडे साहेब, आदरणीय आर. आर. पाटील साहेब, आदरणीय अजितदादा पवार साहेब हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून घडलेले, ग्रामीण महाराष्ट्राने घडवलेले नेतृत्व आहे. त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. महाराष्ट्राला विकासाची दिशा दिली. या नेत्यांनी महाराष्ट्राची आणखी दीर्घकाळ सेवा केली असती. पण हे नेते आज आपल्यात राहीले नाहीत. ही कधीही भरून न निघणारी मोठी पोकळी आहे, अशा भावना यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

## दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

लातूर : दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे. या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत.

# बोलीमुळेच मराठी भाषा व संस्कृती समृद्ध होते - डॉ.सुनीता सांगोले



लातूर : मराठी भाषा संवादाचे प्रभावी माध्यम असून ती विविध बोलींनी नटलेली समृद्ध भाषा आहे.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या बोली मराठी भाषेच्या वैभवाचे प्रतीक आहेत.

मराठी भाषेत कोकणी, पुणेरी, अहिराणी, मालवणी, माणदेशी, बेळगावी अशा विविधांगी बोली बोलल्या जातात.बोली ह्या भाषेचा भाग असतात,त्यातून समाजाची संस्कृती व परंपरा समृद्ध होते.बोलीच भाषेला समृद्ध करत असतात.प्रमाणभाषा ही लिखित असते.पण मनातल्या अंतरिक भावना बोलीतूनच सक्षमपणे मांडता येतात.बोलीत अनेक प्रभावी म्हणी,वाक्यप्रचार आहेत.याशिवाय आकलनाचा परिघ रूंदावण्यासाठी बोलीच महत्त्वाच्या आहेत.म्हणूनच बोलीविषयी मनात असलेले गैरसमज व न्यूनगंड टाळले पाहिजे.कारण बहिणाबाईने बोलीतूनच अप्रतिम काव्याची निर्मिती केली.बोलीचे सौंदर्य जपले पाहिजे.लहान वयापासूनच बोलीतूनच संस्कार होतात.बोलीसंदर्भात जास्तीत जास्त संशोधन झाले पाहिजे आणि मराठीतील बोलीचे जतन व संवर्धन झाले पाहिजे,असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनीता सांगोले यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भाषा विभागाच्या वतीने दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत साजरा होणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ' बोलीचा जागर ' या उद्बोधनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.

यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.याप्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी केले तर आभार डॉ.गजानन बने यांनी मानले.यावेळी सुनील राक्षे,बालाजी यमपुरे,शंकर भालके यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# केंद्र सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? : कॉ. उत्तम होळीकर

लातूर ,/ प्रतिनिधी- इंडियन बँक्स असोसिएशन आणि बँक कर्मचारी, अधिकारी संघटना यांचे मध्ये करारानुसार पाच दिवसांचा आठवडा मान्य होऊन दोन वर्षे उलटली तरीही मोदी सरकारने अद्याप याला मान्यता दिलेली नाही. संसदेतील पाशवी बहुमताची घमेंड जर या सरकारला येऊन भाजपच्या नेहमीचा जुमला करू अशी मस्ती या सरकारला आली असेल, तर ती मस्ती जिरवण्याची ताकद बँक कर्मचारी अधिकारी बाळगून आहेत. या सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? असा संतप्त सवाल बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ.उत्तम होळीकर यांनी विचारला.

आज देशभरातील सर्व बँकातिल सर्व संघटनांचे कर्मचारी यांनी राष्ट्रव्यापी संप पुकारला होता.त्या निमित्त लातूरच्या स्टेट बँकेसमोर सर्वांनी सरकारच्या गर्विष्ठ पनावर राग व्यक्त करीत सरकार विरोधात संतप्त निदर्शने केली. त्यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, पाशवी बहुमताची मोदी सरकारला घमेंड चढली आहे.गेली ११ वर्षे देशवासीयांना जुमला करून या सरकारने मूर्ख बनविले आहे. तसाच प्रकार आता ते बँक कर्मचारी अधिकारी यांचे सोबत करीत आहे पण या सरकारने हे लक्षात घ्यावे की यांची गाठ आमच्याशी आहे. पाच दिवसांचा आठवडा तर मिळवूच पण येत्या १ फेब्रुवारी रोजी देशाच्या अर्थसंकल्पात हे सरकार मॉनिटायझेशन या नावाने देशाची संपत्ती कोण कोणत्या अडाणी अंबानी यांना विकणार आहे, बँकिंग गव्हर्नन्स बील या नावाने बँकांचे समिलीकरण,खाजगीकरण करणार याचेवर लक्ष ठेवून रहा. हे विधेयक येताच लाईटनिग कॉल वरती आपणास संप करावयाचा आहे आणि देश मोदी सरकारच्या हल्लयातून वाचवायचा आहे, हे लक्षात घ्या. हे सरकार मताला आणि सत्तेला घाबरते म्हणून या सरकारची दुखरी नस ओळखा आणि पूर्ण ताकदीचा संघर्ष जो उभा राहील, त्यात देशहितासाठी झोकून द्या, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

बदलत्या बँकिंग परिस्थिती मध्ये कामकाज व जीवन संतुलनसाठी पाच दिवसांचा आठवडा ही बँक कर्मचाऱ्यांसाठी काळाची गरज बनलेली असताना सुद्धा आडमुठेपणाने स्वतः मान्य केलेली मागणी लागू करण्यास केंद्र सरकारकडून टाळाटाळ होते आहे ज्याचे पर्यावसन आजच्या संपात झालेले आहे. द्विपक्ष करारावेळी मान्य केलेला शब्द केंद्र सरकारने तात्काळ पाळावा अन्यथा बेमुदत संपावर जाण्याशिवाय बँक कर्मचाऱ्यांकडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहणार नसल्याचा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे तरुण नेते कॉम्रेड दीपक माने यांनी दिला.

भारतीय इतिहासात प्रथमतः बँक कर्मचाऱ्यांचा संप दडपुन टाकण्यासाठी केंद्र सरकारने वित्त विभागास मैदानात उतरवले आहे. सर्व बँकांच्या चेअरमन ची ऑनलाइन मीटिंग घेऊन संपावरती नसलेल्या बँक कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन बँकिंग व्यवहार सुरळीत ठेवावा व बँक कर्मचाऱ्यांचा संप हाणून पाडावा अशा सक्त सूचना कधी नव्हे त्या प्रथमच वित्त विभागाकडून जारी करण्यात आल्या आहेत. गरज पडल्यास बँकिंग व्यवस्था सुरळीत चालू ठेवण्यासाठी व कर्मचाऱ्यांचा संप हाणून पाडण्यासाठी पोलीस विभागाची सुद्धा मदत घ्या व यासाठी प्रत्येक राज्यांच्या पोलीस महासंचालकांना सुद्धा ऑनलाईन मीटिंग द्वारे तशा सूचना देण्यात आल्या आहेत. एक प्रकारे पाशवी बहुमताच्या जोरावर हा सत्तेचा मुजोरपणा व माजच म्हणायला हवा. परंतु लोकांच्या असलेल्या पाठिंबाच्या बळावरती मोदी सरकारच्या सत्तेचा माज बँक कर्मचारी नक्कीच उतरतील व शेतकरी आंदोलनाप्रमाणेच सरकारला परत गुडघे टेकायला भाग पाडतील . नारायण आणि सुधा मूर्ती सारखे ब्रिटिश चमचे भांडवलदार बेशरमपणे कामगार शोषणाची भलामन करीत आहेत.या जोडप्याने हिंजवडीची जागा किती नाममात्र पैशात लुटली हे तपासावे. तसेच इन्फोसिसच्या इंजिनियर्स तरुणांनी या मूर्ती दांपत्यास धडा शिकविण्याचे आवाहन सुद्धा कॉ.दीपक माने यांनी केले.

या देशामध्ये कोणीही सत्तेचा अमर पट्टा घेऊन जन्माला आलेला नाही त्यामुळे या देशातील जनता सर्वश्रेष्ठ आहे; मोदींचे सरकार नाही हे मोदी सरकारने लक्षात ठेवावे. पाच दिवसांच्या आठवड्याची मागणी ही फक्त बँक कर्मचाऱ्यांची मागणी नसून ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी मानसिकदृष्ट्या व शारीरिकदृष्ट्या कर्मचारी सक्षम असला पाहिजे व त्यासाठी पाच दिवसाचा आठवडा अत्यावश्यक बनलेला असताना सुद्धा कुठल्याही नैतिक व सामाजिक संकेतांना न जुमानता मनमानी पद्धतीने वागणाऱ्या या सरकारच्या विरोधात नाईलाजाने आज आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले असल्याचे ग्रामीण बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. सावंत यांनी स्पष्ट केले.

मागील काही वर्षात बँकांमध्ये कामाचा बोजा कैक पटीने वाढलेला आहे. आठ तासाचे कामाचे स्वरूप असतानाही दहा ते बारा तास बँकेत बसून तसेच सुट्टी दिवशीही बँकेत येऊन प्रलंबित कामे करावी लागत आहेत. बँकांचा व्यवसाय अनेक पटीने वाढलेला असताना सुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी होताना दिसत आहे ज्यामुळे बँक कर्मचारी प्रचंड तणावाखाली काम करीत आहेत. एकीकडे कामाचा बोजा वाढत असताना केंद्र सरकार बँकांमधून कर्मचाऱ्यांची पुरेशी भरती सुद्धा करायला तयार नाही. या वाढलेल्या कामाच्या ओझ्यामुळे कामकाज व जीवन संतुलन यामधील समतोल पूर्णतः बिघडलेला आहे ज्याचा परिणाम बँक कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरती प्रखरतेने जाणवत आहे म्हणूनच बँक कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा




आठवडा अत्यावश्यक झालेला आहे परंतु असे असतानाही आयबीए व केंद्र सरकारकडून पाच दिवसाच्या आठवड्या बाबत कुठलेही सकारात्मक पाऊल उचलले जात नाही व त्यासंदर्भात केवळ कर्मचाऱ्यांना आशेवरती ठेवले जात आहे. बाराव्या द्विपक्षीय करारावेळी सहा महिन्याच्या आत पाच दिवसांचा आठवडा लागू करूयात असे आयबीए व युनायटेड फोर अंतर्गत ठरलेले असताना सुद्धा व या गोष्टीला दोन वर्षे होत आलेली असताना सुद्धा यासंदर्भात कुठलीही सकारात्मक हालचाल घडताना दिसून येत नाही म्हणूनच युनायटेड फोरमने देशभरामध्ये २७ जानेवारी रोजी संपाची हाक दिलेली आहे. बँक कर्मचाऱ्यांची इच्छा नसतानाही त्यांच्यावरती हा संप लादला गेलेला आहे असे ग्रामीण बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड राहुल सावंत यांनी स्पष्ट केले. सलगच्या सुट्ट्या व बँक कर्मचाऱ्यांचा संप यामुळे देशभरातील संपूर्ण बँकिंग व्यवहार ठप्प झालेले आहे व ग्राहकांची अतोनात गैरसोय होते आहे परंतु याला बँक कर्मचारी नव्हे तर केंद्र सरकार व त्यांचे आडमुठे धोरण जबाबदार आहे. केंद्र सरकारने बँक कर्मचाऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये अन्यथा बेमुदत संपाची हाक युनायटेड फोरमला द्यावी लागेल. संघर्षाच्या माध्यमातून कालपर्यंतही बँक कर्मचाऱ्यांचाच विजय झालेला आहे व केंद्र सरकारच्या आडमुठे धोरणाच्या विरोधात संघटितपणे दिलेल्या या लढ्यामुळे बँक कर्मचारी जिंकतील व केंद्र सरकारने मान्य केलेली मागणी त्यांना लागू करायला लावल्याशिवाय बँक कर्मचारी आता शांत बसणार नाहीत असा विश्वास यावेळी बालाजी बावलगे यांनी व्यक्त केला.

यावेळी सचिन नंदागवळे, अंजली स्वामी, परमेश्वर बडगिरे, अनुप देशमुख, स्वप्निल जाधव, राजू दुलेवाड ,सचिन एकोरगे, रेश्मा भवरे, महेश गांधले, प्रीतम गिरी गोसावी यांच्यासह लातूर शहर व परिसरातील दोनशे ते तीनशे बँक कर्मचारी उपस्थित होते.



# दिवंगत नेते स्व.अजितदादा पवार यांना मांजरा साखर कारखाना येथे श्रध्दांजली अर्पण

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी- विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना त्यांच्या दु:खद निधनाबद्दल भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्याबद्दल आदर व्यक्त करण्यात आला. स्व.अजितदादा पवार यांनी सहकार चळवळीला दिलेले योगदान अतुलनीय आहे. साखर कारखाने, दूध संघ, सहकारी बँका व पतसंस्था यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक बळ वाढवण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय उल्लेखनीय आहे. अजितदादा पवार यांनी शेतकरी, कामगार व सहकारी संस्थांच्या हितासाठी सातत्याने घेतलेली भूमिका सहकार क्षेत्रासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे, कार्यकारी संचालक विविध खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृताहुनी गोड मराठी भाषा समृद्ध व संपन्न

## एमआयटी डब्ल्यूपीयूत आयोजित 'मराठी भाषा आणि बोली' परिसंवादात मान्यवरांचा सुर

दै. अदिती एक्सप्रेस

पुणे, / प्रतिनिधी :अमृताहुनी गोड मराठी भाषा समृद्ध व संपन्न आहे. कोसाकोसावर बदलत जाणाऱ्या भाषेत सुद्धा एका बाजुला शुद्ध मराठीतील प्रमाण भाषा, कठोरता, जिव्हाळ्याची आणि अभिमान असणारी मातृबोली यांच्यातील दरी जर आपणास कमी करता आली तर नक्कीच मराठी भाषेला भरपूर फायदा होईल. असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (डब्ल्यूपीयू) च्या स्कूल ऑफ एज्युकेशन यांच्या तर्फे 'मराठी भाषा आणि बोली' या विषयावर आयोजित परिसंवादात मान्यवरांनी आशा व्यक्त केली की मराठी साहित्यिक, प्रकाशक, मराठी पाठ्यपुस्तक, शिक्षक, अभ्यासु वाचक, मराठी भाषेचे जाणकार इ. यांची जबाबदारी आहे की, मराठी भाषेची समृद्धता साहित्यात कशी टिकवून ठेवावी



व त्याच दर्जेदार साहित्यकृतीला महाराष्ट्रात प्रसिद्धी मिळवून द्यावी.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड व कार्याध्यक्ष डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

एमआयटी डब्ल्यूपीयूच्या ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित कार्यक्रमात सुशील धसकटे, उद्धव धुमाळे आणि धनंजय भावलेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ. शामकांत देवरे, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस उपस्थित होते. अध्यक्षस्थानी स्कूल ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. शालिनी टोणपे होत्या. तसेच स्कूल ऑफ एज्युकेशनचे सहायक प्राध्यापक प्रा. प्रिया काळे उपस्थित होत्या.

या प्रसंगी सुनील धसकटे यांनी 'भाषा, बोली आणि आपण' यावर विचार मांडले. भाषेचे संवर्धन करण्याचे कार्य हे शोकांतिकेचे लक्षण आहे. खेड्यातील लोकांनी मराठी भाषेला जीवंत ठेवण्याचे कार्य केले आहे. त्यांनी भाषेबरोबरच संस्कृतीचे जतन केले आहे. भाषेला हस्तांतरीत करण्याचे कार्य बोली भाषा करते. आधुनिक काळात जगातील ५० टक्के बोली भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. विकासाच्या जगात भाषेचा संबंध तुटत असतांना युनो ने सांगितले की मातृभाषेतून शिक्षण दिल्यास शारीरिक, मानसिक, भावनिक व बौद्धिक प्रगती होते.

उद्धव धुमाळे यांनी 'भाषा, बोली आणि वृत्तपत्र' विषायावर मत मांडतांना म्हणाले की, सोशल आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया ने विश्वास गमावल्यानंतर विश्वासार्हता जपणारे प्रिंट मीडियाचे भविष्य उज्वल आहे. दर्पणकार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रसार माध्यमातून सत्तेला आरसा दाखविण्याचे कार्य केले. संपादकीय मध्ये विचारांची बैठक आहे. यातून विचार आणि प्रेरणा मिळते. वर्तमान काळात माध्यमातील लोकांनी शब्दांचा जपून वापर करावा. शब्द अर्थहीन होऊ देऊ नये. मोबाइलच्या अति वापरामुळे विचार संपतो. आज माध्यमांचे काम समाजाला आणि राजकारणी मंडळींना प्रश्न विचारणे आहे. पत्रकारांकडे चिकित्सक दृष्टी बरोबरच ज्ञान आणि कर्माची सांगड हवी आहे. धनंजय भावलेकर यांनी 'भाषा, बोली आणि चित्रपट' या विषयावर विचार मांडले. त्यांनी सांगितले की, भाषेत शुद्ध आणि अशुद्ध अस काही ही नसत. बोली भाषेत उच्चार, डोळ्यांचे भाव, हातवारे याचा समावेश असतो. खर तर न्यायाची भाषा ही प्रमाण भाषा आहे. भाषेतील न्यूनगंड घालविण्याचे कार्य चित्रपटाने केले आहे. मायग्रेशन मुळे भाषा लुप्त होते. त्यामुळेच राज्यातील ३ भाषा आणि देशातील १०० भाषा या लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

त्यानंतर सागर शंकर व डॉ. शालिनी टोपणे यांनी रोजच्या बोलण्यात मराठी भाषेचा वापर करावा असे सांगितले.

प्रा.प्रिया काळे यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. वंदना केंजळे यांनी सूत्रसंचालन केले.

# लोकहितासाठी न्यायालयीन कामकाज मराठीतून व्हावे :डॉ. जयद्रथ जाधव



दै. अदिती एक्सप्रेस

रेणापूर: मातृभाषा मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे.मातृभाषा शिक्षण, प्रशासन, सामाजिक व्यवहार आणि न्यायालयीन कामकाजाची भाषा असणे हे लोकहितासाठी अत्यंत आवश्यक आहे,असे प्रतिपादन मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 'न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा परिणामकारक वापर' या विषयाने रेणापूर विधीज्ञ मंडळाच्या वतीने आयोजित व्याख्यानात शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील प्रा.डॉ. जयद्रथ जाधव बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रेणापूर तालुक्याच्या दिवाणी न्यायाधीश सौ.पी.ए.आपटे मॅडम उपस्थित होत्या.यावेळी व्यासपीठावर दिवाणी न्यायाधीश श्री डी.एम. गीते साहेब, सहाय्यक सरकारी वकील ॲड.श्री. सारोळे साहेब, श्री जमीर शेख साहेब, रेणापूर तालुका वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड.आर.डी.गाडे, सचिव ॲड.जगन्नाथ केदार, सहाय्यक अधीक्षक श्री बालाजी सातभाई व्यासपीठावर उपस्थित होते.

. डॉ. जाधव पुढे असे म्हणाले की, मराठी भाषेला अडीच हजार वर्षाचा समृद्ध वारसा आहे. मराठी भाषेची निर्मितीच सामाजिक, धार्मिक ज्ञान प्रसारासाठी झाली आहे.वारकरी व महानुभाव संतांनी ही परंपरा समृद्ध केली.९५ % बहुजन समाजाच्या सामाजिक लोक व्यवहाराचे साधन मराठी भाषा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मा.यशवंतराव चव्हाण यांनी लोकभाषा मराठीला ज्ञानभाषा करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण, प्रशासन वृत्तपत्र, कायदा आणि न्यायालयीन कामकाजाची भाषा मराठीला प्रथम प्राधान्य दिले. मराठी भाषेतून न्यायालयीन कामकाज करणे म्हणजे सामाजिक लोकशाही स्वातंत्र्याचा विकास करणे होय. न्यायाच्या प्रक्रियेत याचिकाकर्त्यांना सामावून घेणे होय.न्यायालयीन कामकाज पारदर्शक करणे होय. मराठी भाषेतून न्यायालयीन कामकाजातून लोकहिताचे संरक्षण होते.

अध्यक्षीय भाषणात न्या.आपटे मॅडम म्हणाल्या की, मराठी भाषेत संस्काराचे समृद्ध साहित्य आहे. सामाजिक संस्काराचे साधन मराठी साहित्य आहे.म्हणून मराठी भाषा वाचन,व्यवहार, शिक्षण, प्रशासन आणि न्यायालयीन कामकाजासह जीवनाच्या सर्व व्यवहारातून जपली पाहिजे.मराठी भाषेच्या विकासात आपण सर्वांचे योगदान आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.न्या. श्री डी.एम.गीत्ते साहेब यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड केदार साहेब यांनी तर आभार ॲड.आर.डी. गाडे यांनी मानले. या कार्यक्रमला रेणापूर वकील मंडळाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'केशवराज'मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२६ जानेवारी २०२६ सोमवार रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी ठीक ७:४० वाजता श्री केशव शिशु वाटिकेच्या शालेय समितीच्या अध्यक्षा वर्षाताई डोईफोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विभाग प्रमुख रेखा पुरी, केशव शिशु वाटिकेच्या प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी, शिक्षक -पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपूरकर, विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रदीप राऊत व रवींद्र



बारस्कर यांची उपस्थिती होती. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते विज्ञान प्रयोग प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या प्रकट कार्यक्रमाची सुरुवात मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भारत मातेची प्रतिमा तसेच भारतीय संविधान पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्ते विद्यालयातील भूगोल विषयाचे जेष्ठ शिक्षक त्रिंबक कुलकर्णी यांनी प्रजासत्ताक दिन साजरा करण्याची पार्श्वभूमी सांगून हा दिवस साजरा करण्याचा उद्देश सांगितला. भारतीय संविधानात दिलेल्या कर्तव्यांची अंमलबजावणी करणे तसेच लोकशाहीचे रक्षण करणे आवश्यक आहे, असे याप्रसंगी त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव यांनी स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यामधील प्रामुख्याने असलेला फरक सांगितला. राष्ट्राच्या विकासासाठी आवश्यक असणारी कर्तव्ये आपण पार पाडावी असे सांगितले. याप्रसंगी त्यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात सांघिक पद्य संतोष बीडकर यांनी सादर केले. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांचे कवायत संचालन मंजुषा बरसाले यांनी घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत मीरा चामवाड यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मेघा सूर्यवंशी यांनी केले. तर कल्पना कडेपूरकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर विद्यालयातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच परिसरातील सन्माननीय व्यक्ती यांच्या हस्ते शहरातील प्रमुख चार चौकामध्ये भारत मातेच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख तथा कार्यक्रम प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, विज्ञान प्रयोग प्रदर्शनीचे प्रमुख श्याम अंदुरे, भारत माता व संविधान ग्रंथ पूजन प्रमुख आदिनाथ कदम, क्रीडाशिक्षक प्रयागराज गरुड, गुरुनाथ झुंजारे तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# क्वांटम विज्ञानातून भविष्यातील संशोधनाला चालना : सचिव माधवराव पाटील टाकळीकर

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या प्रमाणात प्रगती होत असताना दिसून येत आहे. क्वांटम विज्ञानातून भविष्यातील संशोधनाला चालना मिळेल असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने The Quantum Enigma: Unveiling Reality Secrets या विषयावर एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ.के.एम.जाधव, Mahle Constructor University, Slovenia




येथील डॉ.झाक्लिना लुबेई, तशश्रळझर त्रीळझर, नरसीशल, ऊरींळर येथील अन्तोनिजा बरीसिक, प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मुख्य संयोजक डॉ.एस.एम. डोंगरगे, सहसंयोजक डॉ.ए.एच. हेडाव, सह संयोजक प्रा.आर. एस.देव्हडे, डॉ.एम.एम.बेटकर आणि डॉ.अमित पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.के.एम.जाधव यांनी नवीन तंत्रज्ञान हे क्वांटम तंत्रज्ञानावर आधारित आहे असे सांगितले. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरून डॉ. झाक्लिना लुबेई यांनी मानवाच्या मेंदूची रचना आणि कार्यपद्धती नैसर्गिकरित्या वेगवेगळी असते आणि ही वेगळेपणाची अवस्था आजारपण नसून मानवी विविधतेचा भाग आहे असे सांगितले. अन्तोनिजा बरीसिक यांनी आधुनिक जगात भौतिकशास्त्राचा वापराबद्दल माहिती दिली. तर डॉ. जी. एच. जाधव यांनी फोटॉन सिद्धांत, नॅनो-स्केल डिव्हाइसेसमधील चार्ज कॅरिअर मॉडेलिंग, क्वांटम फिजिक्सचे आधुनिक नियम आणि सेमीकंडक्टर डिव्हाइस स्केलिंगवरील क्वांटम परिणाम या विषयांवर सविस्तर माहिती दिली. आइनस्टाईच्या क्वांटम सापेक्षकांच्या काही संकल्पनांवर आक्षेप घेऊन त्यांच्या विरुद्ध सापेक्ष प्रात्यक्षिक मांडून क्वांटमच्या नवीन संशोधनाला वाट करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रात्यक्षिकासाठी ते प्रयत्नशील आहेत असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.एस.देव्हडे यांनी केले प्रमुख पाहुण्यांचे परिचय प्रा.डॉ. अविनाश हेडाऊ यांनी केले तर आभार डॉ.करणसिंह मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राम पाटील, प्रा.पंकज साळवे, प्रा.गोपाल रांजनकर, प्रा.पी.एल.पाटोळे, प्रा.ए.एस.कल्याणी, प्रा.एस. सी.राजे, प्रा.सोनाली खुब्बा यांचे सहकार्य लाभले. या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतून मिळून ३१७ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता भरडली;धडा शिकविण्यासाठीची हीच ती वेळ

## जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये काँग्रेसला संधी देण्याचे माजी आमदार धिरज देशमुख यांचे आवाहन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर /प्रतिनिधी- काँग्रेस पक्षाने नेहमीच सर्वसामान्य नागरिकाला केंद्रबिंदू मानून काम केले असून जनतेने दाखवलेला विश्वास कधीही तडा जाऊ दिला नाही, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेणापूर तालुक्यातील इंदरठाणा, आरजखेडा, सांगवी आणि दर्जीबोरगाव येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.

यावेळी बोलताना देशमुख म्हणाले की, भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता भरडली जात असून जनतेचे वाटोळे करणा-या भाजपला धडा शिकवण्यासाठीची हीच ती योग्य वेळ आली आहे.भाजपच्या ताब्यात लातूर जिल्हा परिषद असताना केवळ आणि केवळ भ्रष्टाचारच झाला असल्याचे ग्रामीण भागातील मतदार ठामपणे सांगत आहेत. विकासकामांच्या नावाखाली निधीचा गैरवापर करण्यात आला असून अनेक कामे कागदावरच राहिली आहेत, असा आरोप त्यांनी केला.

याउलट काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली असून रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाच्या अनेक योजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या आहेत. या विकासकामांची सविस्तर यादी भाजपवाल्यांना दाखवण्यासाठी आम्ही तयार आहोत, रेल्वे कोच फॅक्टरीच्या मुद्द्यावर



बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रकल्पातून स्थानिक तरुणांना रोजगार दिला जाईल, अशी आश्वासने भाजपने दिली होती. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस भरती न झाल्याने भाजपने जनतेची दिशाभूल करून फसवणूक केली आहे. त्यामुळे तरुणांमध्ये तीव्र नाराजी आहे.

भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक गंभीर झाले असून सर्वसामान्य जनता भरडली जात आहे, असा आरोपही त्यांनी केला. बेरोजगारी वाढवणाऱ्या भाजप सरकारला तरुणांनी जाब विचारायला हवा, असे आवाहन करत काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना संधी देण्याचे आवाहन त्यांनी केले.

तसेच आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून महिलांसाठी स्वयंरोजगार योजना, शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत आणि आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचा काँग्रेसचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रचार सभांना काँग्रेसचे उमेदवार, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील सर्व काँग्रेस आघाडी उमेदवारांना निवडून देऊन विकासाची गती पुन्हा एकदा सुरू करण्याचे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी केले.